राज्यात प्रत्येक जिल्हयात एक अशा तीस (३०) सैनिकी शिक्षण देणा-या शाळा सक्षम व स्वयंसेवी संस्थानां १९९६-९७ पासून उघडण्यास परवानगी देण्याबाबत...

---

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : इसैशा -१०९५/[२७८/९५]/माशि-८,
मंत्रालय विस्तारभवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २६ सप्टेंबर, १९९५.

शासन निर्णय :- महाराष्ट्र राज्यात माध्यमिक स्तरावर सैनिकी शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देण्याचे शासनाने ठरविले आहे. राज्याला थोर नरवीरांची व कुशल योद्ध्यांची उज्वल परंपरा आहे. ती कायम ठेवण्यासाठी आणि महाराष्ट्रातील तरुणांच्या मनात सैन्य दलात भरती होण्यासाठी विद्यार्थी दशेतच आकर्षण निर्माण व्हावे, यासाठी शासनाने हा निर्णय घेतला आहे. सैनिकी शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, शौर्य, साधिकवृत्ती, नेतृत्व, देशभक्ती इत्यादि गुणांची जोपासना व्हावी तसेच आत्मिक विकासासाठी मानसिक संतुलन निर्माण व्हावे हाही उद्देश आहे.

२. राज्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाच्या स्तरावर सैनिकी शिक्षणाची आवश्यकता विचारात घेऊन प्रत्येक जिल्हयात एक अशा तीस सैनिकी शिक्षण देणा-या सैनिक शाळा, सक्षम व स्वयंसेवी संस्थांना, १९९६-९७ पासून उघडण्यास परवानगी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यासाठी १९९५-९६ मध्ये परवानगी द्यावयाच्या ५०० माध्यमिक शाळांपैकी ३० शाळा सैनिकी शिक्षणासाठी राखून ठेवण्यास शासनाची सहमती देण्यात येत आहे.

3. सैनिकी शिक्षण देणा-या शाळा १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून सुरू होण्यासाठी शासनाच्या नवीन योजनेला प्रमुख वृत्तपत्रातून व इतर माध्यमातून प्रसिध्दी देऊन सक्षम इच्छुक स्वयंसेवी संस्थांचे अर्ज दि. ३१. १०. ९५ पर्यंत मागविण्याची कार्यवाही जिल्हयांचे शिक्षणाधिकारी [माध्यमिक], शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, यांनी दि. १५ ऑक्टोबर, १९९५ अखेर/पूर्वी पूर्ण करावी.

४. शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक यांनी प्राप्त झालेल्या अर्जांची प्राथमिक छाननी करुन फक्त सक्षम व स्वयंसेवी संस्थांचे अर्ज विभागीय शिक्षण उपसंचालकांमार्फत शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दि. १५. ११. ९५ पर्यंत सादर करावेत.

..२..

५. इच्छुक सक्षम व स्वयंसेवी संस्थांच्या अर्जामधून योग्य संस्थांची निवड करण्याकरिता खालीलप्रमाणे निवड समिती स्थापन करण्यास शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना शासनाची मान्यता देण्यांत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १] | शिक्षण संचालक, | अध्यक्ष. |
| २] | अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे. | सदस्य. |
| ३] | कमांडंट, भोसला मिलिटरी स्कूल, नाशिक. | सदस्य. |
| ४] | राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी, खडकवासला, पुणे यांचे प्रतिनिधी. | सदस्य. |
| ५] | सहसंचालक ( शालेय शिक्षण ) शिक्षण संचालनालय, पुणे. | सदस्य-सचिव. |

या समितीला इच्छुक संस्थांची अंतिम निवड करुन मान्यता देण्याचे पूर्ण अधिकार आहेत.

६. सैनिकी शाळा सुरु करु इच्छिणाऱ्या स्वयंसेवी व सक्षम संस्थांनी सैनिकी शाळेस आवश्यक असलेले वसतीगृह, भोजनगृह, शालेय इमारत, शैक्षणिक साहित्य व अन्य भौतिक सुविधा, आवर्ती व अनावर्ती खर्च कायम स्वरुपी स्वत:च्या निधीतून निर्माण करणे आवश्यक राहील. या बाबींसाठी शासनाकडून अनुदान प्राप्त होणार नाही.

७. या शाळा पूर्णपणे सैनिकी शाळा असतील. प्रत्येक सैनिकी शाळेतील प्रवेश १९९६-९७ पासून प्रथमत: इयत्ता पाचवीच्या स्तरावर, शारिरिकदृष्टया धडधाकट, कुशाग्र बुध्दिमत्तेच्या ४० मुलांना, शालेय स्तरावरील निवड चाचणीव्दारा देण्यांत यावेत. या विद्यार्थ्यांना शारिरिक कवायत, खेळ, मैदानी शर्यती, वेपन ट्रेनिंग, गिर्यारोहण, मार्शल आर्टस इत्यादि उपक्रम शिकविले जावेत. या सैनिकी शाळा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे या मंडळाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम अंगीकारतील व त्यानुसार संरक्षण शास्त्र ( डिफेन्स स्टडीज ) हा वैकल्पिक विषय म्हणून समाविष्ट करतील. मंडळाच्या अभ्यासक्रमात संरक्षण शास्त्र ( डिफेन्स स्टडीज ) या वैकल्पिक विषयाचा समावेश इयत्ता नववीपासून झालेला असल्याने सैनिकी शाळांच्या दृष्टीकोनातून या विषयाचा इयत्ता पाचवी ते इयत्ता नववीसाठी सुधारित अभ्यासक्रम मंडळाकडून केला जाईल. प्रस्तावित सैनिकी शाळांचे माध्यम मराठी असेल. अपवादात्मक परिस्थितीत इंग्रजी माध्यमातून परवानगी देण्यात यावी. मात्र विज्ञान व गणित

...३..

विषयांसाठी इंग्रजी माध्यम असेल.

८. अभ्यासक्रमातील काही विषयांच्या तासिका कमी करुन त्या तासिका संगणक, नेतृत्वविकास, सामान्यज्ञान, ग्रुपटास्क, कमांड टास्क यासारख्या विषयासाठी देण्यांत याव्यात. शाळेमध्ये शिस्त व शारिरिक क्षमता व नियोजनबध्द कामाला आणि स्पर्धात्मक वातावरणाला अग्रक्रम असेल. सैनिकी शाळांत संस्था, अश्वारोहणासारखा कालबाह्य क्रिडाप्रकार सुरु न करता त्याऐवजी प्रगत युध्द शास्त्रामधील वापर होत असलेल्या इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर, स्ट्रेटजिक स्टडीज्, आरमामेंट स्टडीज् इत्यादि विषयांचा समावेश करतील.

९. अस्तित्वातील सैनिकी शाळांतून आणि प्रस्तावित तीस सैनिकी शाळांतून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांमधून राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये यशस्वी होऊन भारतीय सैन्यामध्ये अधिकाधिकांनी प्रवेश घेऊन देशाची सेवा करावी अशी सैनिकी शाळा चालविणाऱ्या / चालवू इच्छिणाऱ्या संस्थांकडून शासनाची अपेक्षा आहे. म्हणून प्रत्येक सैनिकी शाळेतील सर्वांच्या सर्व पात्र विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या स्पर्धात्मक परीक्षेला प्रविष्ट झाले पाहिजे या अटीच्या अधीन राहूनच सैनिकी शाळांची मान्यता पुढे चालू ठेवण्यात येईल.

१०. शिक्षक मान्यतेच्या प्रचलित सूत्रानुसार माध्यमिक शाळांना एका तुकडीस १.५ शिक्षक मान्य होतो., त्याऐवजी सैनिकी शाळांना प्रत्येक तुकडीत दोन शिक्षक मान्य करण्यास परवानगी देण्यांत येत आहे. या शाळांना मंजूरीच्या पहिल्या वर्षापासून पूर्ण अनुज्ञेय अनुदान देय राहील. प्रत्येक नवीन सैनिकी शाळेत परिशिष्ट-१ मध्ये निर्देशिलेली ११ पदे १९९६-९७ पासून निर्माण करण्यास शासनाची मान्यता देण्यांत येत आहे. या पदांवरील संपूर्ण खर्च अनुदानास पात्र राहिल. तसेच माध्यमिक शाळांकरिता लागू असलेल्या सूत्रानुसार सैनिकी शाळांना वेतनेतर अनुदान अनुज्ञेय राहिल.

११. निवड समितीने निवड केलेल्या प्रत्येक संस्थेला नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर, जिल्हाधिकाऱ्यांमार्फत तीस एकर जमीन नाममात्र मूल्य घेऊन तीस वर्षांच्या करारावर देण्यास शासनाची मान्यता देण्यांत येत आहे. " स्वयंसेवी संस्था जोपर्यंत सैनिकी शाळा, शासकीय अटी व शर्तीनुसार, चालवितील तोपर्यंत शासकीय जमिनी त्या संस्थांकडे राहतील. स्वयंसेवी संस्थांनी सैनिकी शाळा बंद केल्यास संस्था शासनाची जमीन शासनास परत करेल." अशी अट जिल्हाधिकारी यांनी शासकीय जमीन सैनिकी शाळेसाठी संस्थेच्या ताब्यात देतांना घालावी. जिल्हाधिकारी यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनीपैकी सैनिकी शाळेसाठी योग्य असलेल्या जमिनींचा आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल, महसूल

व वन विभागामार्फत, शासनास शालेय शिक्षण विभागात दि. १५.११.९५ पर्यंत सादर करावा.

१२. प्रस्तावित प्रत्येक सैनिकी शाळेसाठी निर्माण करावयाच्या परिशिष्ट- १ मध्ये दर्शविलेल्या पदांवर होणारा वेतन/वेतनेतर अनुदानाचा वार्षिक खर्च रु. ५.१५ लक्ष अपेक्षित असून तीस सैनिकी शाळांसाठी रु. १५५ लक्ष इतक्या वार्षिक आर्थिक खर्चाची तरतूद, प्रथमत: या योजनेचा समावेश १९९६-९७ च्या वार्षिक योजनेत करून, १९९६-९७ या वर्षाच्या वार्षिक योजना मान्य करतांना अधिक नियत व्यय उपलब्ध करून, १९९६-९७ च्या अर्थसंकल्पात योग्य त्या लेखा शिर्षाखाली करण्यात यावी.

१३. सैनिकी शाळांचा दर्जा इतर अशासकीय माध्यमिक शाळांसारखाच असल्याने माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळा सेवाशर्ती अधिनियम १९८१ मधील तरतूदी सैनिकी शिक्षण देणाऱ्या संस्थांना व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू होतील.

१४- हे आदेश नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने आणि वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. १००७/९५/ व्यय-५ अ, दि. ३०.८.९५/ २६.९.९५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वि.शि. प्रभू

[ वि. शि. प्रभू. ]

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
कमांडंट, भोसला मिलिटरी स्कूल, नाशिक.
कमांडंट, राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी, खडकवासला, पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
शिक्षणाधिकारी [प्राथमिक] सर्व जिल्हा परिषदा.
शिक्षणाधिकारी [माध्यमिक] सर्व जिल्हा परिषदा.
सर्व शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई.
नियोजन विभाग" [ योजना- १८],
वित्त विभाग [ व्यय-५ अ ]
महसूल व वन विभाग.
ग्राम विकास विभाग.
नगर विकास विभाग.

...५..

शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. छसैशा १०९३/[२७८/९५]/

माशि-८, दिनांक २६.९.९५ चे सहपत्र.

## परिशिष्ट- १.

प्रत्येक सैनिक शाळेसाठी निर्माण करावयाची पदे.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी [रुपये.] |
|---|---|---|---|
| १] | कमांडंट | १ | ३२००--४६२५. |
| २] | मुख्याध्यापक | १ | २०००--३५०० |
| ३] | शिक्षण निदेशक. | २ | ५०००[एकत्रित वेतन] |
| ४] | संगीत निदेशक. | १ | ३०००[एकत्रित वेतन] |
| ५] | xxx शिक्षक | २[पदे प्रथम वर्षी] | १४००-२६००. |

[ xxx नैसर्गिक वाढीने प्रतिवर्षी वाढ होणाऱ्या तुकड्यांसाठी प्रत्येक तुकडीस दोन या प्रमाणे शिक्षक मंजूर करावे लागतील. ]

शिक्षकेतर कर्मचारी.

| | | | |
|---|---|---|---|
| ६] | लिपिक | २ | ९५०-१५०० |
| ७] | शिपाई. | २ | ७५०--९४०. |

एकूण पदे ११.

महालेखापाल -१ [ लेखा परीक्षा, 0, मुंबई.
महालेखापाल-२ [ लेखा व अनुज्ञेयता ], नागपूर.
महालेखापाल-२ [ लेखा परीक्षा ], नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा.
सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी.
सर्व जिल्ह्यांचे जिल्हा कोषागार अधिकारी.
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई[ दूरदर्शन व आकाशवाणी या माध्यमाव्दारे प्रसिध्दि मिळेल असे कृपया पहावे. ]
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा. शालेय शिक्षणमंत्री यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री [ शालेय शिक्षण ] यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिवांचे कार्यालय.
सचिव[ उच्च व तंत्र शिक्षण ] यांचे स्वीय सहायक.
सचिव[ शालेय शिक्षण ] यांचे स्वीय सहायक.
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
शालेय शिक्षण विभागांतील सर्व कार्यासने.
निवड नस्ती[ माशि-८ ]

2
M.S Jan

महाराष्ट्र शासन

क्रमांक इसैशा १००२/(२२८/०२)/माशि-७,
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १३ नोव्हेंबर, २००२

प्रति,

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)
महाराष्ट्र राज्य,
पुणे

विषय :- सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षापासून सैनिकी शाळा उघडण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना मान्यता

उपरोक्त विषयाबाबत आपले क्रमांक नशैशा/मान्यता/बैठक/०२-०३/१५-क, दिनांक २०.८.२००२ चे पत्र कृपया पहावे.

२. राज्यात प्रत्येक जिल्हयात एक अशी सैनिकी शिक्षण देणारी शाळा सक्षम व स्वयंसेवी संस्थांना सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षापासून सैनिकी शाळा उघडण्यास परवानगी देण्याबाबतच्या धोरणाला अनुसरुन पुढील संस्थेला सैनिकी शाळा सुरु करण्यास शासनाची मान्यता प्राप्त झालेली आहे -

| अ.क्र. | शिक्षण संस्था | सैनिकी शाळेचे नांव व ठिकाण |
|---|---|---|
| १ | मत्स्योदरी शिक्षण संस्था, जालना | मत्स्योदरी सैनिकी शाळा , जालना. |

M. S. S. Jalna
Inword No. 7
Date 20-11-2002.

३. शासनाने वरील संस्थेच्या दिलेल्या मान्यतेच्या संदर्भात अंतिम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही आपल्यास्तरावरुन करण्यात यावी व शासन पत्र क्रमांक इसैशा १०९६/(२०/९६)/माशि-८, दिनांक १८.१.१९९६ मधील

परिच्छेद ३ अन्वये सूचित केल्याप्रमाणे सदर संस्थेच्या व्यवस्थापनास सविस्तर सूचना देण्यात याव्यात. तसेच ३० एकर शासकीय जमीनीसाठी सदर संस्थाचालकांना जिल्हाधिका-यांशी संपर्क साधण्याचे सूचित करण्यात यावे.

४. सदर संस्थेची सविस्तर माहिती संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांना कळवून शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक इसैशा १०९५/(२७८/९५)/माशि-७, दिनांक २६ सप्टेंबर, १९९५ मधील परिच्छेद ११ अन्वये संबंधित संस्थांना ३० एकर शासकीय जमीन त्वरित उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी असे त्यांना सूचित करण्यात यावे.

( ज्यो.मा.चव्हाण)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
सचिव, महसूल व वन विभाग
जिल्हाधिकारी, जालना
विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद.
शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, जालना.
मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
सचिव, शालेय शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक
निवड नस्ती, माशि-७

क्रमांक: नसैशा/मान्यता/२१-०२/१५ क,
माध्य. व उच्च माध्य. शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१,

दिनांक :- 20/11/2002

प्रति,

अध्यक्ष, मत्स्योदरी शिक्षण संस्था
जालना
जि. जालना

विषय :- सन २००२-२००३ पासून सैनिक शाळा सुरु करण्यास परवानगी.... .

संदर्भ :- शासनपत्र क्र. इसैशा १००२/(२२८/०२)/माशि-६ आदेश, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन मुंबई-४०००३२ दि. १३ नोव्हें. २००२

वरील संदर्भीय शासन आदेशानुसार आपल्या संस्थेस जालना या जिल्हयात जालना या ठिकाणी सैनिक शाळा सुरु करण्यास माध्यमिक शाळा संहिता नियम क्र. २.१ चे अधीन राहुन परवानगी देण्यात येत आहे. तरी सोबतचे हमीपत्र भरुन संचालनालयास तात्काळ सादर करावे. सैनिक शाळेसाठी ३० एकर शासकीय जमीन ३० वर्षांकरिता शासकीय दराचे भाडयाने उपलब्ध होणेसाठी आपल्या जिल्हाधिका-यांशी संपर्क साधावा.

२/- शासनाने सैनिक शाळेसाठी मान्य केलेल्या कर्मचारी वृंदाची नेमणूक तात्काळ वृत्तपत्रात जाहिरात देऊन तसेच विहित पध्दतीचा अवलंब करुन नियमानुसार करण्यात यावी. [याबाबत माध्यमिक शाळा संहिता तसेच शासन निर्णय क्र. इसैशा/१०९५/[२७८/९५]/माशि-८, दि. २६.०९.१९९५ मधील तरतूदीचे अनुपालन करावे.]

M. S. S. Jalna
Inword No 8
Date 22-11-2002

३/- सैनिक शाळा परवानगीपासून पाच वर्षात अपेक्षित भौतिक सुविधा संस्थेने उपलब्ध न केल्यास संस्थेची मान्यता रद्द करण्याचा अधिकार शासनाने राखून ठेवला आहे.

४/- आपण सुरु करणार असलेल्या सैनिक शाळेत ४५ विद्यार्थ्यांना २००२-२००३ पासून प्रवेश द्यावयाचा आहे. ४५ विद्यार्थ्यांपैकी पाच आर्थिकदृष्टया मागास [ज्या विद्यार्थ्यांचे पालकाचे उत्पन्न रु.२५,०००/- अथवा त्याहून कमी आहे.] व

पाच माजी सैनिकाचे पाल्यांना प्रवेश द्यावयाचा असून त्यांच्या सर्व खर्च संस्थेने सोसावयाचा आहे. जाहिरात देऊनही माजी सैनिकाचे पाल्य उपलब्ध न झाल्यास सर्वसाधारण प्रवर्गातून नियमानुसार निवड करुन नियमानुसार शुल्क आकारावयाचे आहे.

५/- उर्वरित सर्व विद्यार्थ्यांकडून रु.१५,०००/- एवढे वार्षिक शुल्क आकारावयाचे आहे. सदर शुल्कात विद्यार्थ्यांचे भोजन, निवास आदि. कारणांसाठी येणा-या सर्व प्रकारच्या खर्चाचा समावेश आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना माध्यमिक शाळा संहितेनुसार आरक्षण तत्वाचे पालन करुन प्रवेश द्यावा. समाजकल्याण संचालनालयाकडून त्यांचे शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती केली जाते.

६/- सैनिक शाळांचे व्यवस्थापन व प्रशासन माध्यमिक शाळा संहितेनुसार तसेच सैनिक शाळांसंदर्भात शासन वेळोवेळी प्रस्तुत करीत असलेल्या आदेशानुसार राहील.

७/- सैनिक शाळेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवाशर्ती महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली १९८१ मधील तरतुदीनुसार नियमित होतील. तसेच सैनिक शाळांबाबत शासनाने प्रस्तुत केलेले स्वतंत्र आदेशाचे अनुपालन आवश्यक राहील. सैनिक शाळेतील कमांडंट प्रशिक्षण निदेशक, संगणक निदेशक या पदांच्या नेमणूका खालील पात्रतेच्या अधीन राहून करण्यात याव्यात.

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक/व्यावसायिक पात्रता | वेतनश्रेणी | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १] | कमांडंट | सेवानिवृत्त ले. कर्नल/कर्नल, [जाहिरात देऊन उपलब्ध न झाल्यास सेवानिवृत्ती मेजर] | रु.३२००-४६२५ | ५५ पेक्षा जास्त नसावे |
| २] | प्रशिक्षण निदेशक | सेवानिवृत्त कॅप्टन अथवा सुभेदार मेजर दर्जाचा अधिकारी | रु.५०००/- एकत्रित वेतन | ४० पेक्षा जास्त नसावे. |
| ३] | संगणक निदेशक | संगणक शास्त्रातील पदवीधर समकक्ष डी.सी.एम., डी.सी.ए.ए.डी.सी.एस., एस.एस.ए., एस.सी.एम.पी.जी. डिप्लोमा एन कॉम्प्युटरसायन्स. | रु.३०००/- एकत्रित वेतन | म.खा.शाळा सेवेच्या शर्ती [नियमावली] १९८१ नि.क्र.९ [४][ब] |

...3/-

सैनिक शाळेतील शिक्षक/शिक्षकेतर पदांच्या नेमणूका/सेवाशर्ती महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली १९८१ मधील तरतुदीनुसार नियमित होतील, तसेच अन्य माध्यमिक शाळांप्रमाणे शिक्षण सेवक योजना लागू राहील.

८/- सैनिक शाळेच्या प्रशिक्षण विभागाच्या कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी साठी स्वतंत्र स्थानिक समिती असावी. त्यामध्ये जिल्हा सैनिक मंडळाच्या सदस्यांना स्थान असावे.

९/- सन २००२-०३ साठी प्रवेश परीक्षा घेऊन [इ. ४ थीच्या अभ्यासक्रमावर आधारित] इ. ५ वीत प्रवेश द्यावा, मात्र पुढील वर्षापासून [२००३-०४] सर्व सैनिक शाळांनी इ. ६ वी पासून प्रवेश द्यावयाचा आहे.

१०/- माध्यमिक शाळा संहितेनुसार सैनिक शाळेतील अनुज्ञेय पदे भरताना मागास-वर्गीयासाठी असलेल्या आरक्षण तत्वाचे पालन करण्यात यावे.

११/- विहित नमुन्यातील मासिक अहवाल, संचालनालयास न चुकता सादर करण्यात यावा [द्वितीय प्रत शिक्षणाधिकारी [माध्य] यांचेमार्फत शिक्षण उपसंचालक यांना सादर करावी. ]

१२/- सन २००२-०३ हे शैक्षणिक वर्ष आधीच सुरु झाले असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची विशेष दक्षता घ्यावी व जादा तास घेऊन भरपाई करावी.

१३/- आपल्या सैनिक शाळेचे कार्यक्षेत्र जालना जिल्हयात राहील.

१४/- संस्थेस विशेष सूचना : चालू शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी च्या पहिल्या सत्रामधील अभ्यास पूर्ण करून घेण्यासाठी जादा तास घेऊन तसेच विशेष मेहनत घेऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

शिक्षण संचालकांकरिता.
[माध्य. व उच्च माध्य. ]

सहपत्रे
१] हमीपत्र २] सैनिक शाळा दिशा व अपेक्षा पुस्तिका. ३] अभ्यासक्रम.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.
१] जिल्हाधिकारी, जालना
२/- यांनी संबंधित संस्थेस सैनिक शाळा सुरु करण्यासाठी ३० एकर शासकीय जमीन नाममात्र भाडयाने ३० वर्षांकरिता उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही तात्काळ पार पाडा

...कृ. मा. प... ४/-

२] विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग औरंगाबाद.

३] शिक्षणाधिकारी [माध्यमिक], जिल्हा परिषद, जालना

४] मा. सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.

तारीख/०९. ०८. ०२

जा.क्र.जिपजा/शिक्षण/मा-3/कावि /07-08
कार्यालय जिल्हा परिषद, जालना
दिनांक :- 16 /04/ 2008

प्रति,
मुख्याध्यापक,
पार्थ सैनिकी शाळा,
जालना.

विषय:-**अनुदानित माध्यमिक शाळेच्या नामातंरास परवानगी.**

संदर्भ:-**1) शासन पत्र क्र. इसैशा 1002/ (228/ 02)/ मा.शि.-07 दि. 13 नोव्हेंबर, 2002 अन्वये.**
**2) मत्स्योदरी शिक्षण संस्था,जालना यांचा दिनांक:-17.03.2003 चा ठराव.**
**3) आपले पत्र क्रमांक जा.क्र पासैशाजा/2006-2007/14दि.17.02.2007.**

वरील प्रकरणी आपणास कळविण्यात येते की,आपण केलेल्या विनंती नुसार व मत्स्योदरी शिक्षण संस्था,जालना यांच्या दिनांक:-17.03.2003 च्या ठरावानुसार आपल्या 100%अनुदानित माध्यमिक शाळेच्या नामातंरास **मत्स्योदरी सैनिकी शाळा, जालना ता.जि.जालना** ऐवजी या शाळेचे नाव **पार्थ सैनिकी शाळा,जालना ता.जि.जालना** असे ठेवण्यास / करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

**शिक्षणाधिकारी(माध्यमिक)**
**जिल्हा परिषद, जालना.**

**प्रत.**
1) शिक्षण उपसंचालक ,औरंगाबाद यांना माहितीस्तव
2) अध्यक्ष ,मत्स्योदरी शिक्षण संस्था,जालना.
3) अधिक्षक,वेतन व भ.नि.नि.पथक,जालना .

स्वाक्षरित
**शिक्षणाधिकारी(माध्यमिक)**
**जिल्हा परिषद, जालना.**

जा.क्र.मावि-३/२००२-२००३/ ३०८८०
विभागीय शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
दिनांक : 13-10-2003

13 OCT 2003

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद,
जालना

विषय :- माध्यमिक शाळा संहिता ३.१ नुसार खात्याची प्रथम मान्यता देणे बाबत.

संदर्भ :- १.शासनाचे पत्र क्र.इसैशा१००२/(२२८/०२)माशि-७ दि.१३.११.२००२
२.संचालनालयाचे पत्र क्र.नसैशा/मान्यता/२००१-२००२/१५-क/दि.२०.११.०२
३.या कार्यालयाचे पत्र क्र.मावि-२/२००२-२००३/४९०९७-९८ दि.२४.१२.०३
४.आपले पत्र क्र.जिपजा/शिक्षण/मावि-२/२००३-२००४/दि.३.९.२००३
५.आपले पत्र क्र.जिपजा/शिक्षण/मावि-२/२००३-२००४/४२७०/दि८.१०.२००३

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये शासनाने दिलेली परवानगी व आपले संदर्भीय पत्र क्र.५ अन्वये दिलेल्या नूतनिकरणाच्या अनुषंगाने तसेच संदर्भ पत्र क्र.२ व ३ मधील अटीच्या आधीन राहून माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ५.१ अन्वये प्रधान करण्यात आलेल्या अधिकारानुसार खालील दर्शविलेल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतादेण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | खात्याची प्रथम मान्यता दिल्याचे | | |
|---|---|---|---|---|
| | | वर्ष | वर्ग | तूकडी |
| १. | २. | ४. | ५. | ६. |
| १. | मत्सोदरी शिक्षण संस्था, जालना संचलित, पार्थ सैनिकी शाळा,जालना | जून २००३ | ५वा | १ (एक) वर्ग |

अध्यक्ष जि. उ. म.
जारीत

शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

जा.क्र. जिपजा / शिक्षण / मा-2 /03
कार्यालय जि.प.जा.जालना
दिनांक :- 15/10/03

प्रति
मुख्याध्यापक
पार्थ सैनिकी शाळा,
जालना.

विषय :- <u>माध्यमिक शाळा संहिता 3.1 नुसार खात्याची प्रथम मान्यता देणे बाबत.</u>

संदर्भ :- मा. शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांचे पत्रक क्र. माधि-3/2003-04 30880/
दि. 13/10/2003.

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, मत्स्योदरी शिक्षण संस्था संचलित, पार्थ सैनिकी शाळा, जालना यांना 3.1 ची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

| अनु.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | खात्याची प्रथम मान्यता | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ष | वर्ग | तुकडी |
| 1 | मत्स्योदरी शिक्षण संस्था संचलित, पार्थ सैनिकी शाळा, जालना | सेमी इंग्रजी | जून-2003 | 5 वा | एक वर्ग |

करीता माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, जालना

जा.क्र.जिपजा/शिक्षण/मा-२/कावि/२००८-०९
कार्यालय जिल्हा परिषद,जालना
दिनांक ३०.६.२००८

प्रति,

मा. अध्यक्ष / सचिव,
मत्स्योदरी शिक्षण संस्था, जालना

**विषय :- भाडे तत्वावरच्या इमारतीतुन स्वतःच्या मालकीच्या इमारतीत शाळा भरविण्यास परवानगी देणे बाबत.**

संदर्भ :- आपले पत्र जा.क्र. मशिसंजा/२००८-०९/२५४, दिनांक १२.६.२००८

वरील संदर्भिय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, आपण केलेल्या विनंतीनुसार पार्थ सैनिकी शाळा, जालना पाण्याच्या टाकीजवळ इंदेवाडी अंबड रोड, जालना येथे भाडे तत्वावर घेतलेल्या इमारतीतुन शाळा संस्थेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारती मध्ये कृषी विज्ञान केंद्रा समोर, खरपुडी रोड, जालना येथे भरविण्यास परवानगी देण्यात येत आहे.

**शिक्षणाधिकारी ( माध्यमिक )**
**जिल्हा परिषद,जालना**

प्रतिलिपी,

१. मा. शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
२. अधिक्षक, वेतन व भ.नि.नि.पथक, जालना
३. मुख्याध्यापक, पार्थ सैनिकी शाळा, कृषी विज्ञान केंद्रा समोर,खरपुडी रोड, जालना

**शिक्षणाधिकारी ( माध्यमिक )**
**जिल्हा परिषद,जालना**

जा.क्र.जिपजा/शिक्षण/मावि/2003-04
कार्यालय जिल्हा परीषद, जालना
दि. 23 AUG 2003

प्रति,
मा.मुख्याध्यापक
पार्थ सैनिकी शाळा,जालना
ता.जि.जालना.

विषयः- **सैनिकी शाळेत इयत्ता 5 वी व 6 वी चे वर्ग सुरु करणे बाबत.**

संदर्भः- **1) संचालयाचे पत्र क्र. नसैशा/प्रवेश परीक्षा /2003-04/क दि.21.07.2003**
**2) शासन पत्र क्र.इसैशा/1002/[231/02]/माशि-7 दि. 19.07.2003**

महोदय,

आपल्या सैनिकी शाळेत सन 2003-04 पासून प्रथमतः सहावी पासुन प्रवेश देण्याचे काम सुरु झाले असेल. शासनाने प्रथमतः सन 2003-04 मध्ये 6 वी पासून प्रवेश देण्याचे ठरविले. मात्र सदर धोरणात बदल करुन 6 वी ऐवजी 5वी पासुन प्रवेश देण्याचे आदेश दिले आहेत.

तरी वरिल संदर्भिय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या सैनिकी शाळेत 5 वी व 6 वी हे दोन्हीही वर्ग सुरु करावेत.

शिक्षणाधिकारी(माध्यमिक)
जिल्हा परीषद, जालना.

PSSJ Inword No 10

जा.क्र.जिपजा/शिक्षण/मावि/2004-05
कार्यालय जिल्हा परिषद, जालना
दि.16/06/2004

प्रति,
मा.मुख्याध्यापक,
पार्थ सैनिकी शाळा, जालना
ता. जि.जालना

विषयः- सैनिकी शाळेत नैसर्गिक वाढिने इयत्ता 7 वी चा वर्ग सुरु करणे बाबत.
संदर्भः- आपले पत्र.क्र.पा.सै.शा.जा./2003-2004/64 दि.19.05.2004

महोदय,

आपल्या सैनिकी शाळेत शैक्षणिक वर्ष 2003-2004 या वर्षामध्ये इ. 5 वी व इ 6 वी चे सुरु करण्यास परवानगी देण्यात आली होती. शैक्षणिक वर्ष 2004-2005 साठी आपण नैसर्गिक वाढिने इयत्ता 7 वी चा वर्ग सुरु करण्यासाठी विनंती पत्र सादर केले आहे.

तरी वरिल सदर्भिय पत्रान्वये आपल्या सैनिकी शाळेत शैक्षणिक वर्ष 2004-2005 मध्ये नैसर्गिक वाढिने इयत्ता 7 वी चा वर्ग सुरु करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी(माध्यमिक)
जिल्हा परिषद, जालना.

16/06/04

Inword No (2)

जा.क्र.जि.प.जा./ शिक्षण/ मा.वि./ 2005-06
कार्यालय जिल्हा परीषद, जालना.
दि. 20/06/ 2005

प्रति,
**मा.मुख्याध्यापक**
पार्थ सैनिकी शाळा, जालना,
ता. जि.जालना

विषयः- ***<u>सैनिकी शाळेत नैसर्गिक वाढीने इयत्ता 8 वी चा वर्ग सुरु करणे बाबत.</u>***

महोदय,

वरिल विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या सैनिकी शाळेत शै.वर्ष 2004-05 या वर्षापर्यंत इ 5 वी ते 7 वी पर्यंतचे वर्ग सुरु करण्यास परवानगी देण्यात आली होती. शैक्षणिक वर्ष 2005-2006 साठी आपण नैसर्गिक वाढीने इयत्ता 8 वी चा वर्ग सुरु करण्यासाठी विनंती पत्र या कार्यालयात सादर केले आहे.

तरी वरील संदर्भिय पत्रान्वये आपल्या सैनिकी शाळेत शैक्षणिक वर्ष 2005-2006 मध्ये नैसर्गिक वाढीने इयत्ता 8 वी चा वर्ग सुरु करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परीषद, जालना.

Seen
20/06/05

जा.क्र.जिपजा/शिक्षण/मावि/2006-07
कार्यालय जिल्हा परीषद, जालना
दि. 29/05/2006

प्रति,
मा.मुख्याध्यापक
पार्थ सैनिकी शाळा,जालना
ता.जि.जालना.

विषय:- **सैनिकी शाळेत नैसर्गिक वाढीने इयत्ता 9 वी चा वर्ग सुरु करणे बाबत.**

संदर्भ:- **1) आपले पत्र क्र.जा.क्र.पासैशाजा/2006-07/175 दि.25.05.2006**

महोदय,

वरिल विषयी आपणास कळविण्यात येते की,आपल्या सैनिकी शाळेत सन 2005-06या वर्षापर्यंत 5वी ते 8वी पर्यतचे वर्ग सुरु करण्यास परवानगी देण्यात आली होती.शैक्षणिक वर्ष 2006-07 साठी आपण नैसर्गिक वाढीने इयत्ता 9 वी चा वर्ग सुरु करण्यासाठी विनंती पत्र या कार्यालयास सादर केले आहे.

तरी वरिल संदर्भिय पत्रान्वये आपल्या सैनिकी शाळेत शैक्षणिक वर्ष 2006-07मध्ये नैसर्गिक वाढीने इयत्ता 9 वी चा वर्ग सुरु करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी(माध्यमिक)
जिल्हा परीषद, जालना.

जा.क्र.जिपजा/शिक्षण/मावि/2007-08
कार्यालय जिल्हा परीषद, जालना,
दि. 25.04.2007

प्रति,
मा.मुख्याध्यापक,
पार्थ सैनिकी शाळा, जालना
ता.जि.जालना.

**विषय :- सैनिकी शाळेत नैसर्गिक वाढीने इयत्ता 10 वी चा वर्ग सुरु करणे बाबत.**

**संदर्भ :- आपले पत्र क्र. जा.क्र. पासैशाजा/ 2007-08/ 03 दि. 25.04.2007**

महोदय,

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या सैनिकी शाळेत 2006-07 या वर्षापर्यंत इयत्ता 5 वी ते इयत्ता 9 वी पर्यंतचे वर्ग सुरु करण्यास या कार्यालयाची परवागनी देण्यात आली होती. शैक्षणिक वर्ष 2007-08 साठी आपण नैसर्गिक वाढीने इयत्ता 10 वी चा वर्ग सुरु करण्यासाठी विनंती पत्र या कार्यालयास सादर केले आहे.

तरी वरील संदर्भिय पत्रान्वये आपल्या सैनिकी शाळेत शैक्षणिक वर्ष 2007-08 मध्ये नैसर्गिक वाढीने इयत्ता 10 वी चा वर्ग सुरु करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.

**शिक्षणाधिकारी (माध्य.)**
**जिल्हा परीषद, जालना.**

Seen
26/04/07

IN WORD NO-2
Date: 26.4.2007

C:\My Documents\ABN\Pramanpatra.doc

47

नमुना दोन

ग्राम :- जालना, ता.जालना

दुरध्वनी :-

ई मेल :- फॅक्स :-

जावक क्र.:- दिनांक:-

जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय
(जिल्हा/राज्य यांचे नाव)

क्रमांक दिनांक:- 4/7/13

व्यवस्थापक:- अध्यक्ष/सचिव.______________________ संचलित
पार्थ सैनिकी शाळा,खरपुडी, जालना, ता. जालना
(माध्यम :इंग्रजी ) ( अनुदानित )

विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ यांचा कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,२०११ याच्या नियम ११,पोट-नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

माननीय/महोदय/महोदया,

आपल्या दिनांक / /२०१२ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी याआधारे

मी **शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद जालना** दिनांक १५ जुन २०१२ पासून दिनांक १४ जुन २०१५ पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता 5 ते इयत्ता 10 करीता **पार्थ सैनिकी शाळा,खरपुडी, जालना, ता. जालना** शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन आहे :-**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम,२००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा, पालन करील.
३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना,पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थीसंख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांचा मोफत व सक्तीचे शिक्षण देईल.परंतु आणखी असे की,पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
४. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल.अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र्य बँक खाते देण्यात येईल.
५. संस्था/ शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी; धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत राखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षणपूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास,नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
(पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल.

(कृपया मागे पहा.)

PARTH SAINIKI SCHOOL JALNA
INWARD No. 04
DATE 5 JUL 2013
CLERK PRINCIPAL

(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतू आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमांच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची /तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील; आणि

(आठ) शिक्षकाने /शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेवू नये.याची सुनिश्चिती शाळा करेल.

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या संविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या अलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळीत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे होत्या.

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ
- एकुण बांधकाम क्षेत्र
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ
- वर्गखोल्यांची संख्या
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यादायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल.
- पिण्याच्या पाण्याची सुविधा.
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर.
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रिडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता
- वाचन साहित्या विनासायास उपलब्ध

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र,चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयाजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम,१८६० (१८६० चा २१ ) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या,गटाच्या किंवा व्यक्तिसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरीता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत आहे.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत.प्रत्येक लेखा विवरणाची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकारी कडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक **( Sec-47 )** असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षण संचालक /जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील तसे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

१९. जोडपत्र - तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद जालना.

PARTH SAHNNI SCHOOL JALNA
INWARD No. ...
DATE: 5 JUL 2013
CLERK PRINCIPAL